erPage637892573293055113.jpg (JPEG Image, 1241 × 1755 pi... https://www.ycjournal.net/ResearchNebula/ResearchDocuments/Co...

SHIVAJI COLLEGE HINGOLI

RESEARCH NEBULA

J-Gate INDEXED

ISSN 2277-8071

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

DOI PREFIX 10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN IMPACT FACTOR 7.399

**VOLUME XI, ISSUE I, APRIL 2022**

**Published on 7th April, 2022**

**www.ycjournal.net**

Pexels@Edward Jenner

DataCite Scholarsteer

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

Scanned with OKEN Scanner

ISSN 2277-8071

J-Gate INDEXED

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

DOI PREFIX 10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN IMPACT FACTOR 7.399

**VOLUME XI, ISSUE I, APRIL 2022**

**Published on 7th April 2022**

www.ycjournal.net

Pexels@Edward Jenner

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

Assistant professor
Shivaji College, Hingoli
Tq & Dist. Hingoli (M.S.)



Scanned with OKEN Scanner

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

# PHILOSOPHY OF SAINT JANABAI

ORCID
https://orcid.org/0000-0002-3252-0188

DR. BHUSARE S. R.
Department of Philosophy,
Shivaji College Hingoli, Maharashtra.
srbhusare44@gmail.com

Received: 19.02.2022 Reviewed :23.02.2022 Accepted: 27.02.2022

*ABSTRACT*

*While conducting research, it is important to choose a research topic as well as to decide from which point of view you are going to do your research on that topic and that research should take place there. This dissertation is based on the philosophy, life and personality of Saint Janabai. The present research paper will try to prove it. When we look at the life of Saint Janabai, we realize how much upheaval there is in the normal course of life. Although Jani is an ordinary low caste woman, due to the touch of Warakari sect, she reaches a high position of authority and establishes a great philosophy*

*KEY WORDS:* philosophy, upheaval, life

गोषवारा :-

संशोधन करत असताना संशोधन विषयाची निवड करणे तसेच त्या विषयासंबंधी आपण कोणत्या दृष्टिकोनातून आपले संशोधन करणार आहोत हे ठरवणे आणि ते संशोधन त्या ठिकाणी होणे महत्त्वाचे असते. प्रस्तुत शोध निबंध हा संत जनाबाईंचे तत्वज्ञान, जीवन; व्यक्तिरेखा या विषयाला अनुसरून आहे. प्रस्तुत शोधनिबंधात ते सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भावनिक अंगाने जेव्हा आपण संत जनाबाईंच्या जीवनाकडे बघतो तेव्हा असे लक्षात येते की सामान्यपणे जीवनाची जडणघडण होत असताना किती उलथापालथ होत असते. जनी ही सर्वसामान्य नीच जातीतील स्त्री असूनही वारकरी संप्रदायाच्या स्पर्शामुळे ती एका मोठ्या अधिकार पदावर जाऊन पोहोचते व महान असे तत्त्वज्ञान प्रस्थापित करते.

प्रस्तावना :-

महाराष्ट्रातील संत तत्वज्ञानाचा अभ्यास करत असताना वारकरी परंपरेला महाराष्ट्रात एक वेगळे मानाचं स्थान आहे हे विसरून चालत नाही. म्हणून महाराष्ट्राची ओळख संतांची भूमी म्हणून केला जातो. महाराष्ट्राच्या धार्मिक सामाजिक सांस्कृतिक राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला तर असे लक्षात येईल की महाराष्ट्रातील वारकरी चळवळीचा त्याच्या जडणघडणीवर फार मोठा आणि मोलाचा प्रभाव असल्याचे दिसून येते. त्यामुळे विचारांची प्रगल्भता वारकरी चळवळीतील प्रत्येक सर्वसामान्य संतांच्या ठिकाणी असलेली आपल्याला पाहावयास मिळते. वारकरी संप्रदायाच्या इतिहासात चा धांडोळा घेतला घेताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की समानता, भेदभाव रोहित समाजरचना, अंधश्रद्धा निर्मूलन, जातीयता नष्ट करणे अशी अनेक सामाजिक कार्य समाजात राहून संतांनी केलेली पहावयास मिळते. त्याचेच एक उदाहरण म्हणून संत जनाबाईचा अभंग होय. ज्यामध्ये त्यांनी विठ्ठलाची लेकुरवाळी मूर्ती रेखाटलेली दिसून येते. त्या म्हणतात 'विठु माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा'. या अभंगात त्यांनी वर्णन केले आहे की जातीभेद विसरून विठ्ठल आणि विठ्ठलाचे भक्तगण म्हणजेच महाराष्ट्रातील सर्व जाती-धर्मांचे संत असे एकोप्याने राहतात याचे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल. सर्व जाती-धर्माचे लोक विठ्ठलाच्या चरणी लीन होत असत. लहान-थोर, स्त्री-पुरूष, श्रेष्ठ-कनिष्ठ असा कुठलाच भेद याठिकाणी नसे. चोखा मेळा, गोरा कुंभार, सेना न्हावी, नरहरी सोनार, सावतामाळी असे एक ना अनेक संत विविध जातील मधून एकत्र येत पंढरीच्या वाळवंटात एकत्रपणे एकमेकांना आलिंगन देत असत. त्यांच्या विचारात आणि आचरणात सारखीच समानता दिसून येत असे. समतावादी तत्वज्ञान या सर्व संतांचे ठिकाणे ठासून भरलेले आपल्याला दिसून येते. सर्वजण सुखदुःख, लहान मोठेपण विसरून एकत्र येत असत. यातून त्यांची समभावाची शिकवण लक्षात येते. हे वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान आहे. समताधिष्ठित तत्वज्ञान आपल्या लक्षात येते.

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist. Hingoli (MS.)



219

Scanned with OKEN Scanner

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

1. हा संपूर्ण इतिहास लक्षात घेता संत जनाबाई यांची अभंगवाणी अभ्यासणे तेवढीच महत्त्वपूर्ण ठेवण्यासारखे आहे. संत जनाबाई या उपेक्षित वर्गाचं प्रतिनिधित्व करताना दिसते. जनाबाईच्या जीवनाकडे पाहत असताना जनाबाई नामदेवाच्या घरी आश्रित होत्या. त्यांची आई अतिशय लहानपणी मरण पावली असल्यामुळे व वडिलांनीही त्यांना कंटाळून नामदेवांच्या घरी दामाशेटीकडे आणून सोडले असल्यामुळे अस्पृश्य वर्गातील नकोशी असलेली मुलगी म्हणून दामाजीपंतांच्या घरी वाढली. जनाबाईचा जीवन प्रवास पाहता जनाबाई ही संत नामदेवांपेक्षा चार-सहा वर्षांनी मोठी होती. तिने नामदेवांना अंगा खांद्यावर खेळवले होते. पण नामदेवांचे कुटुंबही शिंपी असल्यामुळे शूद्रांनमध्ये येत असल्यामुळे आणि जनाबाई त्यातही अतिशूद्र जातीत गणली गेलेली असल्यामुळे ती नामदेवांकडे राहत असताना दाराशी म्हणूनच राहिली आहे. तिच्या या दासीपणाचा तिला कुठेच कमीपणा किंवा हीनता वाटलेली नाही. म्हणून जनाबाई स्वतःच स्वतःचा उल्लेख नामयाची दासी जनी असा करते. डॉ. सुहासिनी इर्लेकर म्हणतात "समकालीन लहान-मोठ्या संतांच्या चरित्रांना कीर्तनयोग्य अख्ख्यानरुपे देण्यात रमलेल्या नामदेवाला त्याचे दासीपण अहोरात्र बिरुदाप्रमाणे मिळविणाऱ्या जनाबाईचे लौकिक व अध्यात्मिक चरित्र नोंदवावेसे वाटले नाही."१ अशी खंत त्या व्यक्त करतात. याचा अर्थ नामदेवाने जरी जनीला अनुल्लेखाने मारले असले तरी वारकरी संप्रदायात मिळालेली वागणूक अतिशय उच्च कोटीची होती. म्हणून वारकरी संप्रदायातील संत वेगवेगळ्या जाती धर्मातील असलेले पाहायला मिळतात. कितीही कष्ट सहन करावे लागले तरीही इतरांवर आकांडतांडव करण्याची पद्धत या संप्रदायात पाहायला मिळत नाही. त्यातीलच शांत, निर्मळ, सरळ असलेली जनाबाई. संत जनाबाई यांचा आपण या ठिकाणी संशोधनासाठी अभंग निवडलेला आहे. संत जनाबाईने ब्रह्म स्वरूपा संबंधी लिहिलेला हा अभंग त्यामध्ये त्यांनी विश्वाचे आधारभूत तत्व हे एकच आहे आणि त्यामध्ये सर्व विश्व सामावलेले आहे असे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उद्देश :-

वारकरी संप्रदायात साधेपणाने सर्व संत प्रपंच साधत साधतच परमार्थ साधून सर्वसामान्य जनतेला एक वैचारिक वारसा मागे ठेवत होते. तो पाहता आजच्या काळात या संतांच्या वारशाची आठवण सर्वसामान्यांना करून देणे क्रमप्राप्त ठरते. वारकरी संप्रदायातील महिला तत्वचिंतक या दृष्टिकोनातून संत जनाबाईचे अद्वैत तत्वज्ञान समाजासमोर आणणे हा प्रस्तुत लेखाचा मुख्य उद्देश आहे.

1) जनाबाई ही सामान्य स्त्री असली तरी तिच्या अभंगवाणीने तिला वारकरी संप्रदायात एक वेगळी ओळख निर्माण करून दिली आहे हे सिद्ध करणे.
2) नामदेवांची जनी असली तरी नामदेवाने तिचा साधा उल्लेखही कधी केला नाही हे सिद्ध करणे.
3) संत जनाबाई सुद्धा एक महान तत्वचिंतक होती हे सिद्ध करणे.

विषय विश्लेषण :-

एकेकाळी महाराष्ट्रातील संतांनी आपल्या तत्वज्ञानाने, आपल्याजर शिकवणीने महाराष्ट्राला संपन्न केले होते. महाराष्ट्रातील सामान्य जनांचे वैचारिक प्रबोधन करण्याचे फार मोलाचे काम संतांनी हाती घेतले होते. गरीब-श्रीमंत हा भेद मिटवून सामान्यांच्या मना मनातील दरी नाहीशी करून संतांनी क्रांती घडवून आणण्याचे कार्य हाती घेतले होते. त्यामुळे आपल्याला संत मंडळींमध्ये ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम तर स्त्री संतांमध्ये संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत बहिणाबाई अशी अनेक स्त्रियांची नावे पाहावयास मिळतात. त्यांनी वर्णभेद, लिंगभेद विसरून बहुजन जागृतीचे कार्य केले. अध्यात्माची आवड लोकांच्या मनात निर्माण केली. प्रपंच्यासोबतच परमार्थ ही होऊ शकतो हा विचार सर्व संतांनी बहुजन समाजाच्या मनात निर्माण करण्याचे कार्य केले.

संत जनाबाई त्यातीलच एक त्यांनी नामदेवाच्या आश्रयाला राहून आपली विठ्ठल भक्ती आपल्या अभंगातून अमोघपणे व्यक्त केलेली आहे. ज्ञानदेव, नामदेव प्रभावामुळे त्या काळात बहुजन समाजातील सर्वसामान्य लोक एका पटाकेखाली आले. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि धार्मिक जीवनात एक प्रकारची नवचैतन्य निर्माण झाले. महाराष्ट्राची अस्मिता जागृत झाली. तेराव्या शतकात या संतांच्या पुरोगामी विचारांमुळे महाराष्ट्र ढवळून निघाला. जातीपातीची बंधने नाहीशी झाली. विठ्ठल भक्तीत सर्व संतगण पंढरपूरच्या वाळवंटी न्हाऊन निघाले. सर्व एकत्र आले. याचे वर्णन करताना आपल्या एका अभंगात संत जनाबाई विठ्ठलाला लेकुरवाळा म्हणतात. संत जनाबाईंचे विठ्ठलाशी एवढं सख्य होतं की त्या अनेकदा विठ्ठलाशी भांडत असत. त्याला धारेवर धरत. त्याच्याकडून झाडलोट, दळणकांडण अशी कामे करून घेत असत. त्या म्हणतात 'दळिता कांडिता तुझं गाईन आनंता'. अशा सामान्य स्त्रीलाही वारकरी संप्रदायात

SHIVAJI COLLEGE HINGOLI
Lecturer
Shivaji College, Hingoli
Ta.& Dist.Hingoli (M.S.)

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

SHIVAJI COLLEGE HINGOLI

असामान्यत्व प्राप्त झाले. नामदेवाच्या प्रभावामुळे संत जनाबाईचे भावविश्व फुलले. आणि तिने आपले अनुभव अभंगातून व्यक्त करण्यास सुरुवात केली. संत जनाबाईच्या समकालीन स्त्रियांमध्ये मुक्ताबाई, बहिणाबाई, संत मीराबाई या स्त्रिया होत्या. मुक्ताबाई जो सन्मान वारकरी संप्रदायात मिळाला तो संत जनाबाईला कधीच मिळाला नाही. पण म्हणून जनाबाईची प्रतिभा कम अस्सल होती असे नव्हे. जनाबाईने आपल्या अभंगातून जे तत्वज्ञान मांडले आहे त्याला तोड नाही. पंढरपूरचा विठ्ठल आणि भक्त, तसेच विश्वे आणि या विश्वाचा कर्ता या सर्वांच्या संदर्भात विचार करताना जनाबाईने अशा प्रकारची मांडणी केलेली आहे. यातून आपल्याला ब्रह्म स्वरूपाचे दर्शन घडते. ती म्हणते 'बाई मी लिहिणे शिकले सद्गुरुराया पाशी ब्रम्ही झाला जो उल्लेख' या अभंगातून बुद्धीरुपी मैत्रिणीशी जनाबाईने संवाद साधलेला आहे.

बाई मी लिहिणे शिकले सद्गुरुरायापाशी म्हणजे सद्गुरू कृपेने लिहायला शिकले ब्रह्माच्या ठिकाणी जो उल्लेख म्हणजे प्रारंभीची उत्पत्ती (जगातील) विश्वातील सृष्टी ती नाद (ध्वनी) स्वरुपात झाली आहे. ती म्हणजे ॐ हे होय. ब्रह्माची माया तिलाच तुर्या म्हणावे. जागृती, स्वप्न, सुषुप्ति अवस्था आहे. माया महतत्वाचे सुभर म्हणजे महतत्वाने पुरेपूर आहे. सत्व, रज, तम या तीन गुणांच्या साम्यावस्थेला महतत्व म्हणतात. या तीन गुणांतूनच पंचमहाभूते जन्म घेत असतात असे जनाबाई म्हणते. त्यात पुन्हा पंचवीस भर म्हणजे पंचज्ञानेंद्रिय + पंचकर्मेंद्रिये + पंच तनमात्रे + अहंकार + महतत्व + मन + प्रकृती + पुरुष = 36 = पंचमहाभूते + अहंकार + बुद्धी + अव्यक्त + दहा इंद्रियां + मन + दहा विषय + इच्छा + द्वेष + सुख + दुःख + साधन + चेतना + दृती बारा सूर्याच्या कला, सोळा चंद्राच्या कला, २१६०० वेळा दिवसभरात मानव श्वासोच्छ्वास करतो ती क्रिया अहम म्हणजे तो मीच आहे असा भाव जाणावा. 52 मात्रा म्हणजे ॐकार + स्वर + व्यंजने = बावन्न मातृका.

चार घरे म्हणजे 1) जागृती 2) स्वप्न 3) सुषुप्ती 4) तूर्या, चार खोल्या म्हणजे एकाच्या आत एक अशी या अवस्थेची अवस्था चार पुरुष म्हणजे चार अवस्थांचे अभिनाती :- 1) विश्व 2) तेजस 3) प्राण 4) शुद्ध आत्मा चार नारी ह्या अवस्था जणणारी वृत्ती या सर्वांना ओळखून या अवस्थांमध्ये न येणारी ब्रम्हा अवस्था पाचवी तिथे मी राहिले. पाच शहाणे - पंचज्ञानेंद्रिय, पाच मूर्ख – पंचकर्मेंद्रिये, पाच चालक – पंचप्राण, पाच दरोडेखोर - पाच विषय म्हणजे विवेक केला. चांगले-वाईट सत्य - असत्य याचा एक बिजांकुर होतो. तेच वृक्षाच्या स्वरूपात वाढते. फांद्या, पाने, फुले, फळे हे सर्व एका बीजापासून असते. उदाहरणात कातीन आपल्या शरीरातील विशिष्ट द्रव्यापासून जाळं तयार करते व पुन्हा गिळून एकटीच राहते. त्या कातिनीसारखा ब्रह्मापासून सर्व सृष्टी निर्माण होते व ब्रह्म हातच विलीन होते. तुम्हाला शंका असेल तर तुम्ही ज्ञानदेवाशी पुसावे म्हणजे विचारावे असे त्या सांगतात. पुराणे अध्ययन करून तात्पर्य काढलं तर (कनक - सोने) सोन्याच्या अलंकाराप्रमाणे (आभूषणाप्रमाणे) ब्रह्माचा पसारा आहे हे लक्षात येते. तसा जीवाला अनुभव येतो. हा अनुभव कोणामुळे आला? याचे श्रेय संत जनाबाई सद्गुरुला देते.

संत जनाबाईंच्या चरित्र विषयी विचार व्यक्त करताना डॉ. सुहासिनी इर्लेकर म्हणतात, "दामा व करुंड ह्या माता-पित्याचा जनाबाईशी केवळ जन्म पुरताच संबंध आला. या जन्म कथेतही स्वप्नदृष्टांताची अद्भुत छटा आहेच. जनाबाईची आई तिच्या बालपणीच मृत्यू पावली. तिचे बालपणच संपुष्टात आले. आपल्या आई संबंधीची कोणतीही स्मृती जनाबाईला सांगता येत नाही. बापानेही जनाबाईचे पालन-पोषण करण्याबाबतची स्वतःचे असमर्थता वेळीच ओळखून, तिला दामाशेटीच्या दारी आणून सोडले. जनाबाई मात्र कोणत्या नकळे आंतरिक प्रबळ प्रेरणेने नामदेवाच्या दारी रुजली ती कायमचीच."2 तर जनाबाई बद्दल पुढे गो. म. कुलकर्णी म्हणतात, "जन्माने व कर्माने कोणतेच ऐहिक वा अध्यात्मिक अधिकार ज्यांच्या पदरी पडलेले नाहीत, समाजाच्या तळाच्या गाळातच ज्यांची गणना होते, अशांची अध्यात्मिक वाटचाल सुलभ आणि सोपी करण्यासाठीच भागवत संप्रदायाचा जन्म झाला. जनाबाई या साऱ्या उपेक्षितांचे प्रतिनिधी आहे."3 तर जनाबाई संबंधी उद्गार काढताना प्रा. र. रा. गोसावी म्हणतात, "असहाय्यता, शूद्रत्व, दाष्य आणि स्त्रीत्व या सर्वांना पार करून 'ब्रह्म होऊ असे सर्वा घटी पाहू' असा आत्मविश्वास व्यक्त करणाऱ्या जनाबाईचे भावविश्व तिच्या अभंगवाणीत उत्कटपणे व्यक्त झाले आहे."4

एकूणच जनाबाईच्या व्यक्तिमत्त्व आणि अभंगवाणी विषयी आपल्याला थोडीफार माहिती मिळत असली तरी ती नीच जातीची असल्यामुळे तिची इतर संतासारखी जनमानसात ओळख असलेली दिसत नाही. ती एक सामान्य दासी होती. पण वारकरी संप्रदायाच्या स्पर्शामुळे ती कोणत्या शिखरावर जाऊन पोहोचली होती हे बघण्यासारखे आहे. अभ्यासासाठी निवडलेला जनाबाईचा प्रस्तुत अभंगात अतिशय उच्च कोटीचे तत्वज्ञान मांडताना दिसते. वारकरी संप्रदायात असल्याने

Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq. & Dist. Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

भेदभाव विरहित वातावरणामुळे एखादा सर्वसामान्य संत सुद्धा वैचारिक दृष्ट्या कोणत्या उच्चकोटीला जाऊन पोहोचू शकतो याचे हे उत्तम उदाहरण म्हणावे लागते.

निष्कर्ष :-

1) संत जनाबाई ही सर्वसामान्य स्त्री असूनही एक महान संत परंपरेचे पाईक ठरली.

2) वारकरी संप्रदायाच्या समतावादी तत्वज्ञानामुळे सर्वच जाती धर्मातील लोकांना एकत्र येऊन आपले विचार व्यक्त करता येत होते. म्हणजेच अभिव्यक्ती स्वातंत्र्य होते.

3) संत जनाबाई स्वतःला नामयाची दासी म्हणून घेत असली तरी नामदेवाच्या अभंगवाणीत किंवा लौकिक जीवनात तिचा फारसा उल्लेख संत नामदेव करताना दिसत नाहीत.

संदर्भसूची :-

1) संत जनाबाईचे निवडक अभंग : एक चिंतन संपादक : डॉ. सुहासिनी इर्लेकर, जोशी ब्रदर्स औरंगाबाद.
2) संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध, डॉ. सुहासिनी इर्लेकर
3) संत साहित्य : काही निरीक्षणे, गो. म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे.
4) पाच भक्तिसंप्रदाय, र. या. गोसावी, मोघे प्रकाशन पुणे.

SHIVAJI COLLEGE HINGOLI

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



Scanned with OKEN Scanner